
# बुलडाण्यात ईपीसी इंडस्ट्रीजचे पहिले कृषी वितरण केंद्र सुरु



बुलडाणा (प्रतिनिधी)

महिंद्रा ॲण्ड महिंद्राच्या ईपीसी इंडस्ट्रीज तर्फे पहिले कृषी शोरुम येथील शिवशंकर नगर येथे सुरु करण्यात आले आहे. ईपीसी इंडस्ट्रीचे कार्यकारी संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, महिंद्रा ॲण्ड महिंद्राच्या ॲग्री व अलाइड बिझनेसचे मुख्य कार्यकारी, एएफएस ट्रॅटेजी अशोक शर्मा यांच्या हस्ते या शोरुमचे उद्घाटन करण्यात आले आहे. ईपीसी पुढील पाच वर्षामध्ये देशभरात विविध ठिकाणी अशी केंद्रे सुरु करणार आहेत. शेतकऱ्यांना शेतीशी संबंधित सर्व प्रकारची सेवा देण्याचा या वितरण केंद्राचा उद्देश आहे. लघु पाटबंधारे, त्यात ठिंबक सिंचन, स्प्रिंकलर आणि पीव्हीसी पाइप, बियाणे, पिकांची देखभाल, कीटकनाशक, बुरशीनाशके, तणनाशक, कृषी पंप, माती परिक्षण सुविधा, महिंद्रा समृध्दी केंद्रातर्फे शेतकऱ्यांना ही सुविधा उपलब्ध करून देणार आहे. कृषी सल्ला, पिकानुसार कृषी सल्ला देण्याची सेवा या केंद्रात शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी डिलिव्हर फार्म-टेक प्रॉस्पेरिटी हे स्वप्न पाहण्यात आले आहे. बुलडाणा जिल्हयातील वितरण केंद्राचे उद्घाटन करतांना ईपीसी इंडस्ट्रीजचे कार्यकारी संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, महिंद्रा ॲण्ड महिंद्राच्या ॲग्री व अलाइड बिझनेसचे मुख्य कार्यकारी, एएफएस ट्रॅटेजी अशोक शर्मा म्हणाले की, महिंद्रा ॲण्ड महिंद्रातर्फे शेतीशी संबंधित तंत्रज्ञान देशातील प्रत्येक शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्यातून शेतकरी कृषी तंत्रज्ञानाने समृध्द होतील. तसेच शेतकऱ्यांना अद्ययावत कृषी सल्ला देण्याचीही व्यवस्था यात करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या अगदी जवळ कृतीबाबत आचूक माहिती आणि सेवा देण्याची सुविधा या वितरण केंद्राच्या माध्यमातून प्रथमच मिळत आहे. देशभरात अशा प्रकारचे दालने शेतकऱ्यांसाठी कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यातून शेतकऱ्यांना कृषी तंत्रज्ञान समृध्द करता येणार असल्याचे सांगितले.